<u>प्रतिवादी साक्षीदार क्रमांक ०२</u> <u>नि.क्र.५५ पुढे सुरु</u>

<u>ईस्माईल अमिरसाब शेख</u>

<u>उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री पवार ए.व्ही. यांच्यामार्फत – पुढे सुरु–</u>

**१०.** मी वादीला ओळखत नाही. मी लक्ष्मण किसनराव जाधव तसेच संभाजी रामराव जाधव यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही पुर्वी लक्ष्मण किसनराव जाधव याच्या मालकीची होती. हे मला माहीत नाही की, सदर मिळकत ४० आर ही लक्ष्मण जाधव याचेकडुन वादीने खरेदी घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ पुर्वी दावा मिळकतीबाबत झालेल्या व्यवहाराविषयी मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ पुर्वी दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चित झाल्याविषयी मला काहीही माहिती नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची शासकीय मोजणी केलेबाबत माझ्याकडे अभिलेख उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जमीन मिळकत खरेदी करताना त्याबाबत वकीलांकडुन सर्च रिपोर्ट घेतला नव्हता अथवा पेपरला नोटीस दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्रत्यक्ष कोणाच्या ताब्यात होती हे मला माहीत नव्हते. मला सर्वे नं.०९ च्या जमीनीच्या चतुःसिमा माहीत नाहीत. मला सर्वे नं.०९ च्या ७/१२ वरील तसेच खाते उताऱ्यावरील लोकांची नावे माहीत नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, मला वादी स्वरुप, संभाजी जाधव आणि प्रतिवादी क्र.१ वैजनाथ शिंदे यांच्यातील व्यवहाराविषयी माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला वादीने बोअरवेल मारली आहे. साक्षीदार सांगतो की, सदरची बोअर ही दावा मिळकतीमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची बोअरवेल ही लक्ष्मण याला विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला रस्ता सोडलेला आहे.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर वादीचाच ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर वैजनाथ शिंदे याचा ताबा नव्हता. हे मला माहीत नाही की, वादीने हातऊसणी रक्कम तीन लाख रुपयांपोटी दावा मिळकत ही गहाण करुन दिली होती. हे मला माहीत नाही की, वादीने संभाजी जाधव याचे देणे भागविण्यासाठी दावा मिळकत ही वैजनाथ शिंदे याला नाममात्र स्वरुपात दिली होती. हे मला माहीत नाही की, वैजनाथ शिंदे याचा दावा मिळकतीवर ताबा होता अथवा नव्हता.

**१४.** दिनांक ०९/०५/२०२१ चे खरेदीखत माझ्याकडे आहे. सदरचे खरेदीखत हे गट नं.०९ च्या जमीनीचे आहे. त्याचे क्षेत्र ४० आर आहे. सदर खरेदीखतावरुन ७/१२ ला माझ्या

नावाची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा फेरफार क्र.८०२ हा उपजिल्हाधिकारी यांनी स्थगित केला होता. त्याचे अपील मंत्रालयात प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा मिळकत ही वादीने नांगरली आहे. वैजनाथ शिंदे याचेसोबत सलोख्याचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वैजनाथ शिंदे याला मदत करण्यासाठी वैजनाथ याने माझ्या नावाने विनाताबा खरेदीखत करत दिले आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे नोंदणीकृत खरेदीखताआधारे मी दावा मिळकतीच्या ताब्यात आहे ही बाब मी खोटी नमुद केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी वैजनाथ याच्या सांगण्यावरुन खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्र. नि. स्वीकत,**

Digitally signed by
PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.09
17:24:09 +0530

**(श्री. आवटे पी. पी.)**

**दिनांक – ०९/०४/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण – औसा** **जिल्हा लातूर.**